

# निसर्ग पर्यटन आणि पर्यटनस्थळांचा विकास

**मानवाचा विकास, निसर्गाचे संवर्धन आणि पर्यटनातून मनोरंजन, अशा तिन्ही गोष्टी साध्य करता येतील व विनाशाविना प्रगतीचा सुवर्णमध्य साधता येईल, अशी एक महत्त्वपूर्ण बाब म्हणजे निसर्ग पर्यटन. येत्या ६ ते १० ऑगस्टदरम्यान पुण्याच्या साखर-संकुलांमध्ये भरविल्या जाणाऱ्या 'ग्रीन-विक' या निसर्गपर्यावरण प्रदर्शनाच्या निमित्ताने**

मृणाल वनारसे

'केल्याने देशाटन मनुजा चातुर्य येतसे फार' हा भारतीय परंपरेतील पर्यटनविषयक दृष्टिकोन. अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. सध्याचा प्रवासी बाहेर पडतो तो नेहमीच्या धावपळीच्या आयुष्यातून थोडी उसंत घेऊन सुखसोयींनी परिपूर्ण विसावा घेण्यासाठी, ताजेतवाने होऊन परत कामाला लागण्यासाठी. हे सध्याचे पर्यटन आणि चातुर्य येण्यासाठीचे देशाटन, यात थोडा फरक आहे आणि 'इको-टुरिझम' किंवा निसर्ग पर्यटन या अलीकडे स्थिरावत असलेल्या पर्यटनाच्या प्रकारचा तोच गाभा आहे. निसर्ग पर्यटनामध्ये मजा आहे; पण सुस्त जड विश्रांती नाही. विचाराला खाद्य आहे, निर्हेतुक करमणूक नाही. आपले अनुभवविश्व समृद्ध करण्याची ताकद आहे; भोवतालच्या निसर्गाला हानी पोचेल अशा मनोरंजनाला जागा नाही. म्हणून तर गेल्या शतकाच्या अखेरपासून सुबुद्ध जाणत्या पर्यटकांचा हा आवडता पर्यटनप्रकार बनलेला आहे. ज्या देशांना महायुद्धाची झळ बसली, जिथे यंत्राची प्रगती झपाट्याने झाली आणि माणूस आणि निसर्ग यांच्यातली दरी रुंदावली, अशा देशांमध्ये हा पर्यटनप्रकार सर्वांत आधी स्थिरावला- निसर्गाला जपण्यासाठी, निसर्गाशी नाते पुन्हा एकदा जोडण्यासाठी.

भारतात निसर्ग पर्यटन हा शब्द अगदी अलीकडेच ऐकू येऊ लागला आहे. खरे तर 'देशाटना'विषयी एवढी सुबुद्ध भूमिका असणाऱ्या संस्कृतीत हा पर्यटनप्रकार योग्य रीतीने रुजायला आणि वाढायला हवा होता; परंतु आजची परिस्थिती बरीच वेगळी आहे. निसर्ग पर्यटन म्हणजे निसर्ग जपणुकीसाठी पर्यटन. आपण मात्र त्याचा अर्थ प्रेक्षणीय स्थळांना भेटी देणे इथपर्यंत सीमित केला आहे. अशी नयनरम्य निसर्गस्थळे म्हणजे आपली संरक्षित जंगले, नद्या, पाणवठे, पाणथळ जागा आपल्या देशाच्या संपूर्ण भूभागाच्या तुलनेत केवळ चार टक्के एवढी आहेत. भीमाशंकर, काझीरंगा, कान्हा, ताडोबा अशी संरक्षित वने म्हणजे आपली राष्ट्रीय संपदा. यांना संरक्षित घोषित केले गेले ते तिथल्या जैविक विविधतेसाठी आणि नैसर्गिक साधनसंपत्तीसाठी. प्रत्यक्षात असे होते आहे, की शहरांच्या वाढत्या गर्दीला, प्रदूषणाला आणि कर्कश आवाजाला कंटाळलेल्या शहरवासीयांची पावले या शांत आकर्षक वन्य प्रदेशांकडे वळत आहेत. दर वर्षी राष्ट्रीय वने आणि उद्यानांना भेट देणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत भरपूर वाढ होते आहे. याचे नजीकचे फायदे असे, की यातून उद्योगाच्या नवीन संधी उपलब्ध होत आहेत, रोजगाराच्या शक्यता वाढत आहेत आणि कल्पक व्यावसायिकांना या क्षेत्रात नवे काही करून बघण्यास खूप वाव निर्माण झाला आहे. परंतु दूरवरचा विचार केल्यास आणि त्यासाठी फार दूरचा नको, येत्या दशकाचा जरी विचार केला तरी असे लक्षात येईल, की या अनिर्बंध पर्यटनांनी आपल्या संरक्षित निसर्गावर जो ताण येतो आहे तो पुढे आपल्याला महागात पडणार आहे. इथले जैववैविध्य नाहीसे होऊ लागले. ओढे, नद्या, जंगले अशा परिसंस्थांचा ऱ्हास होऊ लागला आहे आणि याचा थेट संबंध आपल्या रोजच्या आयुष्याशी आहे. अशा अनिर्बंध पर्यटनातून आपण या उद्योगाचा जो पाया आहे म्हणजे निसर्ग, त्यावर घाव तर घालत नाही ना, याचा गंभीरपणे विचार करायची वेळ आली आहे. अन्यथा व्याज तर नाहीच मुद्दलही गमावून बसण्याची वेळ येईल.

खरे तर निसर्ग पर्यटन व्यवसायात अशी संधी आहे, की माणसाचा विकास आणि निसर्ग पर्यटन, अशा दोन्ही गोष्टी साध्य करता येतील आणि हा सुवर्णमध्य गाठण्यासाठी उत्तम उपाय म्हणजे संरक्षित प्रदेश सोडून इतर ठिकाणी निसर्ग पर्यटनस्थळे विकसित करणे. उजाड डोंगर असो किंवा पडीक माळरान, निसर्गाचे पुनरुज्जीवन करून निसर्ग पर्यटन राबवायचे असल्यास कोणताही भूभाग वर्ज्य नाही. हा विकास करण्यासाठी शास्त्रीयदृष्ट्या पद्धतशीर प्रयत्न करणे गरजेचे आहे.